तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ११ जून २०२५

आतील पानावर
पान २– काजोलच्या 'माँ'चा ट्रेलर प्रदर्शित
पान ३– विकी कौशल झळकणार हरभजनच्या...
पान ४– उमराव जान पुन्हा होणार...
पान ५– प्रभासच्या राजासाबची रिलीज डेट अखेर...
पान ६– मराठमोळ्या प्रथमेशची बॉलिवूडमध्ये वर्णी

सध्या मराठी चित्रपटसृष्टीत जबरदस्त आणि दर्जेदार चित्रपटांची चलती आहे. अशातच गणराज स्टुडिओ आणि 'संजय दावरा' एक्सपरिअन्स निर्मित, नितीन वैद्य प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'मना'चे श्लोक' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. येत्या १ ऑगस्ट रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे. या व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या एका खास दरवाजाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. त्या दरवाज्याचे एक दार निळे तर दुसरे लाल रंगाचे असून या दृश्यातून 'मना'चे श्लोक' हा चित्रपट मानवी मनाच्या खोल, गुंतागुंतीच्या भावनांचा शोध घेतो, हे स्पष्ट होते.

अनेकदा चित्रपटात नायिकेसोबत एक किंवा दोन नायक पाहायला मिळतात, मात्र या चित्रपटात मृण्मयी देशपांडेसह सहा नायक दिसणार आहेत का असे हा व्हिडीओ पाहून वाटतेय. राहुल पेठे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब हे सहा अभिनेते या चित्रपटात झळकणार आहेत. आता हे सहाही अभिनेते मृण्मयीचे नायक आहेत का? याचा उलगडा लवकरच होणार आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन अभिनेत्री आणि दिग्दर्शिका मृण्मयी देशपांडे यांनी केले आहे. श्रेयश जाधव राष्ट्रीय पुरस्कार विजेते 'बाबू बँड बाजा' नंतर 'मना'चे श्लोक' मधून नवीन कथा घेऊन येत आहेत.

चित्रपटाबद्दल मृण्मयी देशपांडे म्हणते, दिग्दर्शक, लेखिका म्हणून हा माझा दुसरा चित्रपट आहे. ही माझ्या मनातलीच गोष्ट आहे, जी मी चित्रपटाच्या माध्यमातून साकारली आहे. यात माझ्यासोबत सहा गुणी अभिनेते आहेत. ज्यांच्यामुळे एक छान टीम जुळून आली आहे. एकंदरीत सगळेच खूप छान जमून आले आहे. म्हणूनच या चित्रपटासाठी मी खूप उत्सुक आहे. निर्माते संजय दावरा म्हणाले गणराज स्टुडिओसोबत आणि मृण्मयीसोबत माझे जुने नाते आहे. 'मना'चे श्लोक' ही एक अनोखी संकल्पना आहे आणि मला वाटते मराठी चित्रपटसृष्टीत अशा प्रकारचा विषय पहिल्यांदाच मांडला जात आहे. या कथेवर मी आणि मृण्मयी अनेक दिवस काम करत होतो आणि आता आम्ही प्रदर्शनासाठी सज्ज आहोत. प्रेक्षकांनाही हा चित्रपट नक्कीच भावेल, याची मला खात्री आहे. निर्माते श्रेयश जाधव म्हणतात, खूप वेळानंतर एक उत्तम आशय व कथा प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहोत. मृण्मयीचे लेखन, दिग्दर्शनाची कामगिरी याआधी ही पाहिली आहे. या चित्रपटातून प्रेक्षकांना नक्कीच काहीतरी वेगळे व रंजक पाहायला मिळेल.





# मृण्मयी देशपांडे झळकणार सहा हिरोंसोबत!

# दिशा पटानीची आता हॉलीवूडमध्ये एन्ट्री !

बॉलिवूड अभिनेत्री दिशा पटानी तिच्या बोल्ड लूकसाठी नेहमीच चर्चेत असते, ती आता हॉलिवूडमध्ये तिच्या हॉट मूव्हज दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. दीपिका पदुकोण, आलिया भट्ट आणि प्रियांका चोप्रा यासारख्या अभिनेत्रींच्या पावलावर पाऊल ठेवत आता दिशाही हॉलिवूडकडे वळली आहे. ती ऑस्कर विजेत्या दिग्दर्शकाच्या चित्रपटातून हॉलिवूडमध्ये एन्ट्री करणार आहे. 'होलीगार्ड्स' या सुपर नॅचरल ॲक्शन-थ्रिलर चित्रपटातून दिशा हॉलिवूडमध्ये एन्ट्री करणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन केविन स्पेसी करणार आहेत. विशेष म्हणजे या चित्रपटाद्वारे केविन तब्बल २० वर्षांनी चित्रपटसृष्टीत परतणार आहेत. या चित्रपटात डॉल्फ लुंडग्रेन, टायरेस गिब्सन आणि ब्रायना हिल्डेब्रँड सारखे अनेक हॉलीवूड स्टार्स दिसणार आहेत. 'होलीगार्ड्स' हा 'स्टँटिगार्ड्स विरुद्ध होलीगार्ड्स' नावाच्या फ्रँचायझीचा भाग असून या चित्रपटात जबरदस्त ॲक्शन पाहायला मिळणार आहे. सध्या हा चित्रपट पोस्ट-प्रॉडक्शनपासूनच खूप चर्चेत आहे. त्यामुळे प्रेक्षक होलीगार्ड्स' चित्रपटाची वाट पाहत आहेत. सोशल मीडियावर चित्रपटाच्या सेटवरील दिशाचा एक फोटोही व्हायरल झाला आहे. दिशाचा हा पहिलाच हॉलिवूड चित्रपट आहे. ती या चित्रपटात कोणती भूमिकेत असणार आहे, याबाबत माहिती मिळू शकलेली नाही. दिशा यापूर्वी जॅकी चॅनसोबत 'कुंग फू योगा'मध्ये दिसली होती. दिशाच्या बॉलिवूडमधील कामाबद्दल बोलायचे झाले तर, ती लवकरच 'वेलकम टू द जंगल' या कॉमेडी चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार आणि संजय दत्तसह एक मोठी स्टारकास्ट असणार आहे.



# संजय दत्तच्या 'खलनायक'चा सीक्वेल येणार

'नायक नही...खलनायक हू मै'... हे गाणं वाजलं की संजय दत्तचा 'खलनायक' सिनेमा डोळ्यासमोर येतो. १९९३ साली आलेल्या सिनेमात संजय दत्त आणि माधुरी दीक्षितची जोडी होती. माधुरीचं 'चोली के पिछे क्या है' हे गाणंही तुफान हिट झालं. सिनेमात जॅकी श्रॉफ, राखी, राम्या कृष्णन यांचीही भूमिका होती. बल्लू, राम आणि गंगा यांची ती कहाणी होती. आता याच सिनेमाचा सीक्वेल येणार आहे. दिग्दर्शक सुभाष घईनी याबद्दल कन्फर्मेशन दिलं आहे.

आजकाल सीक्वेलच्या जमान्यात अनेक गाजलेल्या सिनेमांच्या सीक्वेलची चर्चा सुरु असते. सुभाष घईना अनेकदा 'खलनायक'च्या सीक्वेलबद्दल विचारणा झाली. आता नुकतंच त्यांनी यावर कन्फर्मेशन दिलं आहे. एका मुलाखतीत ते म्हणाले, हो, येत्या काळात खलनायक २ नक्की घेऊन येणार आहे. सिनेमाच्या स्क्रिप्टचं काम फायनल झालं आहे. आता सिनेमातील स्टारकास्टची निवड करणं हे आमच्यासमोर आव्हान आहे. याशिवाय तांत्रिक गोष्टीही पूर्ण करायच्या आहेत. संजय दत्त आणि माधुरी या सीक्वेलमध्ये काम करण्यासाठी तयार व्हावेत यासाठी मी पूर्ण प्रयत्न करेन. 'खलनायक' ९० च्या दशकातील ब्लॉकबस्टर सिनेमा होता.




संजय दत्तने अँटी हिरो बल्लू बलरामचं काम केलं होतं. या भूमिकेतून त्याने प्रेक्षकांवर छाप पाडली होती. माधुरी दीक्षित गंगा या महिला पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत होती जी बल्लूला पकडण्यासाठी त्याच्यासोबत असल्याचं नाटक करत असते. तर जॅकी श्रॉफ राम या पोलिस अधिकाऱ्याची भूमिकेत होता. अभिनेता प्रमोद मुथू खलनायक होता. अभिनेता संजय दत्त आगामी काही सिनेमांमध्येही दिसणार आहे. यामध्ये 'हाऊसफुल ५', रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी' हे सिनेमे आहेत. तसंच सलमान खानसोबतही त्याचा सिनेमा येणार आहे ज्याचं टायटल अद्याप समोर आलेलं नाही.

# काजोलच्या 'माँ'चा ट्रेलर प्रदर्शित

बॉलिवूड अभिनेत्री काजोल हिची मुख्य भूमिका असलेला 'माँ' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून काजोल पहिल्यांदाच हॉरर चित्रपटात काम केले आहे. मुंबईतील एका कार्यक्रमात 'माँ' चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा संपन्न झाला. ट्रेलरमध्ये काजोल तिच्या मुलीचे राक्षसांपासून रक्षण करताना दिसत आहे. या चित्रपटातून तिने पहिल्यांदाच एका हॉरर चित्रपटात काम केले आहे. हा चित्रपट अजय देवगण आणि आर माधवन यांच्या गेल्या वर्षी आलेल्या 'शैतान' चित्रपटाच्या दुनियेतील पुढचा चित्रपट असणार आहे. या चित्रपटात काजोल एका आईची भूमिका साकारताना दिसत आहे. यावेळी काजोल म्हणाली की, हा माझा पहिला पौराणिक-भयपट आहे. पात्राच्या तयारीच्या प्रश्नावर काजोल म्हणाली की, मी पात्रासाठी जास्त तयारीवर विश्वास ठेवत नाही. जेव्हा संपूर्ण टीम एकत्र काम करते तेव्हा एक चांगला चित्रपट बनतो. असं अभिनेत्री म्हणते. दरम्यान, यावेळी हॉलिवूडच्या हॉरर चित्रपटांशी आणि त्यांच्या कथांशी तुलना करण्याच्या प्रश्नावर अजय देवगण म्हणाला की, आपल्याकडे मिथक आहेत, त्यावर कथा बनवणे आवश्यक होते. आपल्याकडे खरी कथा आहे, ती एक्सप्लोर करणे महत्वाचे आहे. 'शैतान' चित्रपटाची तुलना करताना अजय म्हणाला की, दोन्ही चित्रपटांची तुलना होऊ शकत नाही. यावेळी अजय म्हणाले की, एकेकाळी हॉरर चित्रपटांना मुख्य प्रवाहात मानले जात नव्हते. मला माहित नाही की लोकांनी कधीही मोठ्या स्टारकास्टसह का प्रयत्न केला नाही. दरम्यान, या चित्रपटात अभिनेता आर माधवन देखील दिसणार आहे.



# विकी कौशल झळकणार हरभजनच्या चरित्रपटात



बॉलीवूड अभिनेता विकी कौशल हा सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांतून विविध भूमिका साकारल्या आहे. यातून नेहमीच त्याने अतुलनीय कामगिरी करत प्रेक्षकांकडून दाद मिळवली आहे, त्यामुळे आता त्याचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला आहे आणि त्याच्या प्रेक्षकांच्या त्याच्याकडून खूप अपेक्षाही आहेत. केवळ प्रेक्षकच नव्हे तर अनेक प्रसिद्ध लोकांचा तो आवडता अभिनेता आहे. माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगनंही नुकतेच विकी कौशलबद्दल वक्तव्य केलं आहे. एका मुलाखतीमध्ये हरभजन सिंग विकी कौशलबद्दल बोलताना म्हणाला, माझ्या चरित्रपटासाठी अभिनेता विकी कौशल योग्य निवड असेल. तो खूप उत्तम अभिनेता आहे. विकी कौशलच्या अभिनयाने केवळ प्रेक्षकांनाच नव्हे तर खेळाडूंनाही भुरळ घातली आहे. तो अनेकांचा आवडता कलाकार आहे. परंतु, त्यामुळे आता विकी कौशल माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगच्या चरित्रपटात झळकणार का? याचं उत्तर येणाऱ्या काळातच मिळेल. गेल्या वर्षभरात विकी मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीझोतात आला. याचं कारण म्हणजे त्याचा 'छावा' हा चित्रपट. यामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारत त्याने अनेकांच्या मनात जणू कायमचं घर केलं आहे. यातील त्याच्या भूमिकेचं अनेकांकडून कौतुक झालं. विकी साकारत असलेल्या प्रत्येक भूमिकेसाठी प्रचंड मेहनत घेत असतो, त्यामुळे त्याने केलेलं काम प्रेक्षकांपर्यंत पोहोचतं. विकी कौशलला नुकतीच बॉलीवूडमध्ये दहा वर्ष पूर्ण झाली आहेत. यादरम्यान त्याने विविध चित्रपटांमध्ये काम केलं आहे. परंतु, त्याच्या 'उरी', 'सॅम बहादुर', 'छावा' या चित्रपटांतील कामाने मात्र प्रेक्षकांचं विशेष लक्ष वेधलं. आता 'छावा'च्या यशानंतर विकी दिवंगत चित्रपट दिग्दर्शक गुरू दत्त यांच्या चरित्रपटात झळकणार असल्याचं म्हटलं जात आहे.




# आमिरच्या 'पीके'चा दुसरा भाग लवकरच!

अभिनेता आमिर खान हा चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि त्याच्या भूमिकांसाठी ओळखला जाणारा अभिनेता आहे. आमिरने प्रत्येक चित्रपटातील भूमिकांमधून प्रेक्षकांसमोर अभिनेता म्हणून स्वत:ची एक वेगळी बाजू समोर आणली आहे. यापैकीच एक म्हणजे 'पीके'मधील भूमिका. घोषणा झाल्यापासूनच 'पीके' चित्रपट अनेक सकारात्मक व नकारात्मक कारणांनी चर्चेत होता. या चित्रपटातील भूमिकेबद्दल आमिरला बऱ्याच प्रमाणात ट्रोलिंगला सामोरे जावे लागले. पण याउलट अनेकांनी या चित्रपटाचं कौतुकही केलं. अशातच या चित्रपटाच्या आणि आमिर खानच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे, ती म्हणजे 'पीके' चित्रपटाचा दुसरा भाग येणार असल्याचं म्हटलं जात आहे. आमिर खान आणि राजकुमार हिरानी हे 'पीके २' बनवण्याचा विचार करत आहेत. चित्रपटाच्या पटकथेवर काम सुरू झाले आहे. तसंच या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूरची भूमिका असल्याचंही म्हटलं जात आहे. चित्रपटात रणबीर एलियनची भूमिका साकारणार असून यासाठी तो खूप उत्सुक आहे. याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, 'लाल सिंग चड्डा'नंतर आमिर पुन्हा एकदा मोठ्या पडद्याद्वारे प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज आहे. आमिर 'सितारे जमीन पर' हा चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. येत्या २० जून रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. यात त्याच्यासह जिनिलीया देशमुखही मुख्य भूमिकेत आहे. याशिवाय आमिरने 'महाभारत'सारख्या चित्रपटात काम करायचं असल्याची इच्छा व्यक्त केली होती. याबद्दल त्याने माझं एक स्वप्न आहे की, मला महाभारतावर आधारित चित्रपट बनवायचा आहे.

# जान्हवीसोबत दिसणार 'हा' हॅण्डसम हंक

बॉलिवूड दिग्दर्शक, निर्माता करण जोहर विविध कारणांमुळे चर्चेत असतो. लवकरच तो एक रोमॅन्टिक चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. या चित्रपटाचं नाव लग जा गले... असं आहे. दरम्यान, राज मेहता दिग्दर्शित आणि करण जोहरची निर्मिती असलेल्या या आगामी प्रोजेक्टमध्ये अभिनेत्री जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत दिसणार असल्याचं म्हटलं आहे. त्याचबरोबर पहिल्यांदाच एक हँडसम हंक अभिनेता तिच्यासोबत रोमान्स करताना दिसणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाल्याचं पाहायला मिळतंय. आता या अभिनेत्याच्या नावावरुन आता पडदा हटवण्यात आला आहे. राज मेहता दिग्दर्शित हा चित्रपट रोमान्स आणि ॲक्शन सीन्सने परिपूर्ण असणार आहे. २०१८ मध्ये करण जोहरच्या 'धडक' चित्रपटातून आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात करणारी अभिनेत्री जान्हवी कपूर या चित्रपटात फीमेल लीडमध्ये दिसणार आहे. रिपोर्टनुसार, जान्हवीसोबत अभिनेता टायगर श्रॉफ 'लग जा गले' चित्रपटात स्क्रीन शेअर करणार आहे. दरम्यान, दोघे पहिल्यांदाच या चित्रपटात एकत्र काम करत आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही एक सूडाची प्रेमकथा असेल. त्यामुळे जान्हवी आणि टायगरला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते प्रचंड उत्सुक आहेत. माहितीनुसार, सध्या अभिनेता टायगर श्रॉफ हा त्याच्या 'बागी ४' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. तर जान्हवी कपूर 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' सिनेमाचं शूट करत आहे. त्यांच्या या चित्रपटांचं चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर ते दोघे 'लग जा लागे' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करतील.





# आलियाला करायचाय 'या' अभिनेत्यासोबत चित्रपट

बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री आलिया भट्ट सध्या तिच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमधील लूकमुळे चर्चेत आली आहे. अशातच नुकतीच आलियाने एक मुलाखत दिली. यावेळी आलियानं सिनेमा, कला यांबद्दल तिची मतं मांडली. यावेळी तिनं अभिनेता फहाद फासिलबद्दलही वक्तव्य केलं आहे. ती म्हणाली, फहाद फासिलच्या कामाचं मला खूप कौतुक करावंसं वाटतं. तो एक उत्कृष्ट अभिनेता आहे. 'आवेशम' हा माझा आवडता चित्रपट आहे. मला त्याच्यासह काम करण्याची इच्छा आहे. आलियानं त्याच्यासह अभिनेता रोशन मॅथ्यूचंही कौतुक केलं आहे.

रोशनबद्दल बोलताना ती म्हणाली, आपल्याकडे खूप चांगले कलाकार आहेत. मला 'डार्लिंग'मध्ये रोशन मॅथ्यूबरोबर काम करण्याची संधी मिळाली याचा आनंद आहे. तो एक उत्तम अभिनेता आहे. आजवर त्यानं अनेक मल्याळी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आता तो हिंदीतही काम करू पाहत आहे.

आलिया भट्टनं यादरम्यान प्रादेशिक भाषेतील कलाकृतींचंही कौतुक केलं आहे. प्रादेशिक चित्रपटांबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली, कोरोनानं मला एक गोष्ट शिकवली की, आपण प्रत्यक्षात एकत्र आहोत आणि आता आपल्याला एकाच ठिकाणी सर्वांना पाहता येणारं जागतिक व्यासपीठ उपलब्ध आहे. या व्यासपीठाद्वारे तुम्ही कोणत्याही प्रकारचं मनोरंजन पाहू शकता. आलिया भट्टनं आजवर अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. ती बॉलीवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. मुलीच्या जन्मानंतरही आलिया अभिनय क्षेत्रात पूर्वीप्रमाणेच सक्रिय असल्याचे दिसते. तिने आजवर 'गंगूबाई काठियावाडी', 'कलंक', 'गल्ली बॉय', 'राझी' यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तसेच तिनं 'आर.आर.आर.' या दाक्षिणात्य चित्रपटातही महत्त्वाची भूमिका साकारली आहे.



# तब्बल १५ वर्षांनंतर 'राजनीति'चा सीक्वल येणार?

प्रकाश झा दिग्दर्शित 'राजनीति' हा चित्रपट २०१० मध्ये सुपरहिट ठरला होता. या चित्रपटामध्ये अभिनेता अर्जुन रामपाल, रणबीर कपूर, मनोज वाजपेयी, कतरिना कैफ यांसारखी स्टारकास्ट पाहायला मिळाली. हा चित्रपट अजूनही सर्वोत्तम राजकीय थ्रिलर चित्रपटांपैकी एक आहे. हा चित्रपट प्रदर्शित होऊन जवळपास १५ वर्षे उलटली आहेत, पण अजूनही हा सिनेमा लोकांच्या आठवणीत आहे.

दरम्यान, अशातच चित्रपटाचे दिग्दर्शक प्रकाश झा यांनी राजनितिच्या सीक्वलबद्दल मोठी अपडेट दिली आहे. 'राजनीति' हा दिग्दर्शक म्हणून प्रकाश झा यांचा आत्तापर्यंतचा सगळ्यात हिट चित्रपट समजला जातो. हा मल्टी-स्टारर चित्रपट ४ जून २०१० मध्ये प्रदर्शित झाला होता. आता लवकरच या चित्रपटाच्या सीक्वल येणार असल्याचे संकेत दिग्दर्शक प्रकाश झा यांनी दिले आहेत. अलिकडेच ते म्हणाले, राजनीतिचा प्रवास सुरुच होता. त्यामुळे यापूर्वीच 'राजनीतिचा-२' बद्दल योजना आखली होती. दरम्यान, कास्टिंग आणि शूटिंगच्या बाबतीत अद्याप काहीही ठोस असं सांगता येणार नाही. परंतु, सध्या याच्या स्क्रिप्टवर काम चालू आहे. असं म्हणत प्रकाश झा यांनी चित्रपटाच्या सीक्वलची हिंट दिली आहे. याबद्दल सांगताना पुढे ते म्हणाले, या चित्रपटाच्या प्री-प्रोडक्शनची प्रोसेस जवळपास एक वर्ष चालली. आम्ही एका गर्दीच्या सीनसाठी जवळपास, ८००० लोकांना एकत्र आणणं, जे आमच्यासाठी खूप कठीण होतं. कास्टिंगबद्दल बोलायचं झालं तर आम्ही ज्यांना संपर्क केला त्या प्रत्येकाला या चित्रपटाचं कथानक आवडलं. असा म्हणत प्रकाश झा यांनी चित्रपटाच्या शूटिंगच्या आठवणी ताज्या केल्या.

# उमराव जान पुन्हा होणार सिनेमागृहात रिलीझ



अभिनेत्री रेखाला १९८१ च्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, खय्यामला सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक, आशा भोसलेला सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका आणि मंदूरला सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळालेला हिंदी चित्रपटसृष्टीतील क्लासिक चित्रपट 'उमराव जान' या महिन्याच्या अखेरीस पुन्हा एकदा चित्रपटगृहात दाखल होत आहे. १८९९ मध्ये प्रकाशित झालेल्या मिर्झा हादी रुसवा यांच्या कादंबरीवर आधारित हा चित्रपट मुझफ्फर अली यांनी दिग्दर्शित केला आहे. 'उमराव जान' चित्रपटाच्या रीलसना डिजिटली वाढवण्यात आले आहे आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रह यांनी संयुक्तपणे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ४ के रिझोल्यूशनमध्ये चित्रपटगृहांमध्ये दाखवण्यासाठी हा चित्रपट तयार केला आहे. चित्रपटाच्या पुनर्प्रकाशनाच्या निमित्ताने दिग्दर्शक मुझफ्फर अली एक अतिशय खास कॉफी टेबल बुक देखील प्रकाशित करणार आहेत. असे म्हटले जाते की हे कॉफी टेबल बुक 'उमराव जान' चित्रपटाच्या निर्मितीचे दुर्मिळ पडद्यामागील फुटेज सादर करते. याशिवाय, या पुस्तकात चित्रपटाच्या सेटवरील छायाचित्रे, सुलेखन, कविता आणि वैयक्तिक आठवणी देखील आहेत. चित्रपटात रेखावर चित्रित केलेल्या खय्यामच्या संगीतातील शहरयारच्या रचनांपैकी, दिल चीज क्या है, इन आंखों की मस्ती आणि जुस्तूजू जिस्की थी हे अजूनही हिंदी चित्रपट संगीताचा वारसा आहेत. रेखा म्हणते, मी उमरावमध्ये काम केले असेल, पण ती माझ्या आत राहते, ती अजूनही माझ्यातून श्वास घेते. जेव्हा हा चित्रपट बनवला गेला तेव्हा आपल्यापैकी कोणीही कल्पनाही केली नव्हती की हा चित्रपट काळ आणि अवकाशाच्या पलीकडे जाईल. कोणाला माहित होते की हा चित्रपट हळूहळू भारतीय चित्रपटसृष्टीच्या आत्म्यात स्वतः ला कोरेल. मोठ्या पडद्यावर परत येताना पाहणे म्हणजे नवीन पिढीने जुने प्रेमपत्र उघडल्यासारखे आहे. याबद्दल बोलताना माझे हृदय भावनेने भरून जाते. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट वारसा अभियानांतर्गत उमराव जानचे पुनर्संचयित करण्यात आले आहे.





# राजामौलींच्या सिनेमातून नानांची एक्झिट


दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक एस.एस.राजामौली त्यांच्या आगामी SSMB 29 सिनेमामुळे चर्चेत आहेत. या सिनेमात महेश बाबू मुख्य अभिनेत्याच्या भूमिकेत आहे. तर बॉलिवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्रा मुख्य नायिकेची भूमिका साकारणार आहे. SSMB29 मध्ये अभिनेते नाना पाटेकरही महत्वाच्या भूमिकेत दिसणार होते. पण, आता मात्र नानांनी राजामौलींच्या सिनेमातून एक्झिट घेतली आहे. राजामौलींनी SSMB29 सिनेमाची नानांना ऑफर दिली होती. २०२४ मध्ये राजामौली स्वत: सिनेमाची ऑफर घेऊन नाना पाटेकर यांना भेटायला पुण्याला गेले होते. त्यांनी नानांना सिनेमाची स्क्रिप्टही सांगितली होती. त्यानंतर नानांनी लूक टेस्टही दिली होती. नानांना या सिनेमासाठी २० कोटींचं मानधन ऑफर करण्यात आलं होतं. त्यांचं १५ दिवसांचं शूटिंग शेड्युल लागणार होतं. मात्र, आता रिपोर्टनुसार, नाना पाटेकरांनी राजामौलींच्या सिनेमाची ऑफर नाकारली आहे. मॅशेबल इंडियाने दिलेल्या रिपोर्टनुसार, राजामौलींनी ऑफर केलेल्या भूमिकेत वेगळं काही करण्यासारखं नसल्याने नानांनी सिनेमातून एक्झिट घेतली आहे. भविष्यात, नानांनी राजामौलींसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. राजामौलींच्या SSMB29 सिनेमाचं शूटिंग जानेवारी महिन्यात सुरू झालं आहे. या सिनेमाच्या शूटिंगसाठी प्रियांका चोप्रा भारतात आली होती. प्रियांकाने महेश बाबूसोबत हैदराबादमध्ये सिनेमातील काही सीन्सचं शूटिंग केलं होतं. प्रियांका आणि महेश बाबूसोबत या सिनेमात पृथ्वीराज सुकुमारनदेखील आहेत.

# प्रभासच्या राजासाबची रिलीज डेट अखेर ठरली

'दक्षिण चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट अभिनेता प्रभास सध्या त्याच्या 'द राजा साब' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. बर्याच काळापासून या चित्रपटाच्या प्रदर्शनाला काही काळ विलंब होत होता. सध्या प्रभासच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दलचा सस्पेन्स आता संपला आहे. हॉरर कॉमेडीने भरलेला हा चित्रपट प्रेक्षकांचे प्रचंड मनोरंजन करणार आहे. प्रभास या चित्रपटात दुहेरी भूमिकेत दिसत आहे. उत्कृष्ट अभिनयाच्या मदतीने हा अभिनेता चित्रपटातील त्याच्या व्यक्तिरेखेत जीवंतपणा आणणार आहे. चित्रपटाच्या प्री-प्रॉडक्शनमुळे त्याचे प्रदर्शन लांबत होते पण आता चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. अभिनेत्याने त्याच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर एका पोस्टद्वारे चित्रपटाच्या प्रदर्शनाची माहिती दिली आहे. प्रभासने चित्रपटाचे पोस्टर शेअर करून याची अधिकृत घोषणा केली आहे. प्रभासने सांगितले आहे की हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. यावर अभिनेत्याने लिहिले आहे की, '५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये भेटू. पोस्टच्या कॅप्शनमध्ये प्रभासने सांगितले आहे की 'द राजा साब'चा टीझर १६ जून रोजी प्रदर्शित होईल. ही बातमी येताच, अभिनेत्याचे चाहते आता चित्रपटाची आणि टीझरची आतुरतेने वाट पाहत आहेत. सध्या चाहत्यांना टीझरवर समाधान मानावे लागेल पण टीझरबद्दल अधिक माहितीसाठी चाहत्यांना वाट पहावी लागेल. या चित्रपटात प्रभास दोन पात्रांमध्ये दिसत आहे, परंतु निधी अग्रवाल व्यतिरिक्त, मालविका मोहनन आणि श्रद्धा कुमार देखील मुख्य भूमिकेत आहेत. अभिनेता संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत दिसत आहे. चित्रपटात बाबाला पाहिल्यानंतर चाहते त्याचा उत्कृष्ट अभिनय पाहण्यास उत्सुक आहेत.

# थलपती विजयचा 'हा' असेल शेवटचा चित्रपट

जन नायगन हा थलपती विजय यांचा आगामी चित्रपट आहे. ज्याचा अर्थ लोकांचे नेते असा आहे. हा चित्रपट ९ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. एच.विनोद यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट हा थलपती विजयचा शेवटचा चित्रपट असणार आहे. शेवटचा कारण या चित्रपटानंतर विजय पूर्णपणे त्यांच्या राजकीय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित करणार आहे. कदाचित म्हणूनच या चित्रपटाबद्दल लोकांमध्ये एक वेगळीच उत्सुकता आहे. हा चित्रपट भव्य दिव्य बनवण्यासाठी निर्माते कोणतीही कसर सोडत नाही आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार चित्रपटाचे हक्क विक्रमी किमतीत विकले गेले आहेत. 'जन नायगन'च्या सॅटेलाइट हक्कांबाबत अनेक स्टुडिओमध्ये वाद सुरू आहे. परंतु निर्मात्यांनी सन टीव्हीसोबत हा करार अंतिम केला आहे. 'जन नायगन' चे सॅटेलाइट हक्क ५५ कोटी रुपयांना विकले गेल्याचे वृत्त आहे. हा कोणत्याही तमिळ चित्रपटासाठी सर्वात मोठा करार आहे. यापूर्वी चित्रपटाच्या ओटीटी कराराबद्दल बातम्या आल्या होत्या. या चित्रपटाचा ओटीटी करार अमेझॉन प्राइम व्हिडीओसोबत झाला असल्याची बातमी आली होती. या तमिळ चित्रपटाचे हक्क अमेझॉनने १२१ कोटी रुपयांना विकत घेतले आहेत. तसेच या चित्रपटात थलपती विजयनं २७५ कोटी रुपयांची फी घेत आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील ही सर्वाधिक फी आहे. 'जन नायगन' विषयी आणखी एक महत्त्वाची बातमी म्हणजे, हा चित्रपट नंदमुरी बालकृष्ण यांच्या २०२३ मधील 'भगवंत केसरी' या चित्रपटाचा रिमेक असल्याचे बोलले जात आहे. थलपती विजयसोबत 'जन नायगन'मध्ये पूजा हेगडे पडद्यावर दिसणार आहे. या चित्रपटात बॉबी देओल, गौतम वासुदेव मेनन, प्रकाश राज, नारायण, प्रियमणी, ममिता बैजू, मोनिशा ब्लेसी आणि वरलक्ष्मी सरथकुमार यांच्यासह इतर कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.



# 'ऑल इज वेल' लवकरच चित्रपटगृहात

पोटापाण्याच्या शोधात मुंबईत आलेल्या अमर, अकबर आणि अँथनी या तिघांच्या आयुष्यात एका अनपेक्षित घटनेने कशी खळबळ उडते? याची धमाल गोष्ट 'ऑल इज वेल' या चित्रपटात आहे. वाणीश्री फिल्म प्रॉडक्शन्स या चित्रपट निर्मिती संस्थेच्या आगामी 'ऑल इज वेल' या मराठी चित्रपटात अमर, अकबर आणि अँथनी नावाच्या तीन मित्रांच्या मैत्रीची धमाल गोष्ट मांडण्यात आली आहे. तसेच आयुष्याच्या प्रवासातील उलथापालथ निस्तरताना त्यांची मैत्री कशी खुलते, हे मजेशीर पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न दिग्दर्शक योगेश जाधव यांनी या चित्रपटात केला आहे. मनोरंजन आणि मस्तीचे जबरदस्त पॅकेज असलेल्या 'ऑल इज वेल' चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश जाधव, तर लेखन प्रियदर्शन जाधव यांचे आहे. या चित्रपटाचे निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर आहेत. सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी आहेत. शुक्रवार, २७ जूनला 'ऑल इज वेल' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे, रोहित हळदीकर हे जबरदस्त त्रिकुट 'ऑल इज वेल' या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले असून या तिघांसोबत चित्रपटात सयाजी शिंदे, अभिजीत चव्हाण, नक्षत्रा मेढेकर, सायली फाटक, माधव वझे, अजय जाधव, अमायरा गोस्वामी, दिशा काटकर आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. 'तीन तिघाडा काम बिघाडा' अशी एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. आता मात्र 'खूब जमेगा रंग, जब मिल बैठेंगे तीन यार संग' असे म्हणत प्रियदर्शन जाधव, अभिनय बेर्डे आणि रोहित हळदीकर यांच्या



दोस्तीची दुनियादारी 'ऑल इज वेल' चित्रपटातून पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे कार्यकारी निर्माते संजय ठुबे आहेत. पटकथा आणि संवादलेखन प्रियदर्शन जाधव यांनी केले आहे.

संगीत चिनार- महेश, अर्जुन जन्या यांचे आहे. छायांकन मयुरेश जोशी, तर संकलन अथश्री ठुबे यांचे आहे. नृत्यदिग्दर्शक राजेश बिडवे, तर साहसदृश्ये अजय ठाकूर पठाणीया यांची आहेत. वेशभूषा कीर्ती जंगम, तर रंगभूषा अतुल शिधये यांनी केली आहे. गीतकार मंदार चोळकर आहेत. गायक रोहित राऊत, गायिका अपेक्षा दांडेकर यांनी 'ऑल इज वेल' चित्रपटातील गाणी गायली आहेत.

# मराठमोळ्या प्रथमेशची बॉलिवूडमध्ये वर्णी

मयुरीचा 'टाइमपास' सिनेमामुळे प्रसिद्धी मिळवलेला आणि दगडूची भूमिका साकारून घराघरात पोहोचलेला अभिनेता म्हणजे प्रथमेश परब. अतिशय मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या प्रथमेशने अभिनय आणि टॅलेंटच्या जोरावर त्याने सिनेसृष्टीत नाव कमावलं. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी सिनेमांमध्येही प्रथमेश झळकला. आता पुन्हा एकदा प्रथमेश हिंदी सिनेमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाला आहे. प्रथमेशला लॉटरी लागली आहे. प्रथमेशची आणखी एका बॉलिवूड सिनेमात वर्णी लागली आहे. विशेष म्हणजे या सिनेमात प्रथमेश मुख्य नायकाची भूमिका साकारताना दिसणार आहे. नुकताच या सिनेमाचा मुहुर्त पार पडला. याचे फोटो शेअर करत प्रथमेशने ही गुडन्यूज चाहत्यांना दिली आहे. प्रथमेशच्या या नव्या बॉलिवूड सिनेमाचं नाव 'पॉडर' असं आहे. मुख्य नायक म्हणून माझा पहिला हिंदी सिनेमा. उत्सुक असण्यासोबतच थोडा नर्व्हसही आहे, असं त्याने पोस्टमध्ये म्हटलं आहे. प्रथमेशच्या या पोस्टवर चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. 'बालक पालक' या सिनेमातून प्रथमेशने मोठ्या पडद्यावर पाऊल ठेवलं होतं. या सिनेमात त्याने छोटीशी भूमिका साकारली होती. त्यानंतर 'टाइमपास' सिनेमातून मुख्य भूमिका साकारत त्याने अभिनयाची झलक दाखवली. 'टकाटक', 'डिलिव्हरी बॉय', 'डार्लिंग', 'उर्फी', 'लालबागची राणी' अशा अनेक सिनेमांमध्ये त्याने काम केलं आहे. 'सिंघम' आणि 'सिंघम २' या बॉलिवूड सिनेमात प्रथमेश दिसला होता. या सिनेमांमध्ये त्याने अजय देवगणसोबत स्क्रीन शेअर केली होती.



# मराठीत सुध्दा सुपरस्टार होवू शकतो

मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी गेली अनेक वर्षे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. वेगवेगळ्या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी विनोदी भूमिका साकारुन प्रेक्षकांना खळखळून हसवलं. मनोरंजनविश्वातील प्रत्येक कलाकारासोबत त्यांचं जिव्हाळ्याचं नातं आहे. महाराष्ट्र भूषण आणि पद्मश्री अशोक सराफ यांचा नुकताच वाढदिवस झाला. अशोक सराफ यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने त्यांचा ' अशोक. मा. मा' या मालिकेतील सहकलाकार इंद्रनील कामतने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केली आहे. इंद्रनीलची ही पोस्ट लक्षवेधी ठरत आहे. अभिनेता इंद्रनील कामतने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर अशोक सराफ यांच्या वाढदिवसानिमित्त सुंदर पोस्ट लिहून भावना व्यक्त केल्या आहेत. या पोस्टमध्ये अभिनेत्याने म्हटलंय, हिमालयाची सावली...! तुम्हाला म्हणालो तसं, मी माझ्या कॉलेजवयीन इंद्रनीलला सांगितलं की मी आता अशोक सराफ यांच्यासोबत काम केलं तर हसेल तो माझ्यावर, विश्वास नाही बसणार त्याचा. तुमच्यासोबत काम करत असताना कामावर निष्ठा कशी ठेवावी हे समजून घेता आलं. मला माणूस म्हणून, कलाकार म्हणून तुम्हाला अनुभवता आलं, काम करण्याची संधी मिळाली हा मी स्वामींचाच आशीर्वाद समजतो! यापुढे इंद्रनीलने लिहिलंय, तुम्ही आम्हा तरुण कलाकारांना विश्वास दिलेला आहे की मराठीमध्ये सुद्धा सुपरस्टार निर्माण होऊ शकतो. तुमच्या इतकं वलय निर्माण करणं अशक्यच. पण, तुमच्या पाऊलावर पाऊल ठेवण्याचा कलाकार म्हणून नेहमीच प्रयत्न राहील. तुमच्या वाढदिवसानिमित्त मी आशीर्वादच मागेन! तुम्हाला मी काय शुभेच्छा देणार, तुम्ही आमचे सुपरस्टार आहात, यंग मॅन! हॅपी बर्थडे...! अशी सुंदर पोस्ट अभिनेत्याने लिहिली आहे. काम केले आहे. सध्या प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी मालिका म्हणजे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेत ती परीक्षकाच्या भूमिकेत आहे.






**'तदबीर से बिगडी हुयी तकदीर बना लो अपने पे भरोसा है तो एक दाव लगा लो... १९५१ सालच्या 'बाजी' चित्रपटात एका अड्ड्यावर देव आनंद व गीता बाली असतात. देव आनंद नैराश्येने तिथून वरच्या मजल्यावर जाताना गीता बाली हातातीलगिटार झंकृत करून त्याला अडविताना... 'हे हे हे-हे हे...' गीता दत्तच्या नशिल्या आवाजात म्हणताना चेहर्यावर छद्मी मिश्कील हास्य प्रसवून नेत्र भ्रुकुटीच्या मादक हालचाली करून त्याला रोखतात. देव आनंद वापस येतात. गीता बाली खुर्चीवर बसून गिटार वाजवत अंतरा म्हणतात... 'अपने पे भरोसा है, तो एक दाव लगा ले...' या प्रसंगातील गीता बालीच्या अभिनयाची जातकुळीच वेगळी आहे, या संकेत चतुराईने सहज लक्षात येते.**

सुनो गजर क्या गाये समय गुजरता जाये... त्याच चित्रपटातील हे गाणे क्लेरोनेटच्या साथीत गीता बालीच्या सामूहिक नृत्यातील आहे. ओ ल ळ ळा' म्हणत स्टेजवर प्रकट होणार्या गीता बाली बाकी चार नृत्यांगनांसोबत फेर धरतात. सर्वांच्या नजरा चुकवून नृत्य करतानाच नेत्र व भ्रुकुटीच्या सजग हालचालींनी देव आनंदला धोक्याचा इशारा देतात. तेव्हा 'सो ना ना- खो ना ना' अशी दक्षता घ्यायला सांगतात. शेवटी विपरीत झाल्यास 'दोष ना देना मुझे फिर पछतायेगा' हेही कळकळीनं गायला विसरत नाही.ये रात ये चांदनी फिर कहाँ सुन जा दिल की दास्तान... १९५२ सालच्या 'जाल' चित्रपटातील हे गीत पडद्यावर गीता बाली व देव आनंद यांच्यावर चित्रित असून दर्याकिनारी चांदण्या रात्री प्रेमी युगुलांचे प्रेमभरे गुंजन या मधुर गाण्यात आहे. हेमंत कुमार यांचा सुरुवातीचा हुंकार आकाश गलबलून टाकतो. नुसत्या हमिंगमधून हृदयाची तार छेडणाऱ्या आवाजाच्या प्रतिध्वनीतूनच प्रसंगाची रंगत वाढते.

देव आनंद या मनमोहक निसर्ग सान्निध्यात म्हणतात- झाडाच्या फांद्यावर स्थिरावल्यासारख्या या चांदण्या ज्या रात्रीची रंगत वाढवीत आहेत, त्या थोड्या वेळाने निघून जातील व रंगत संपून जाईल. अशी रात्र पुन्हा लाभणार नाही. म्हणून तू माझी अवस्था जाण. अकस्मात अवनीवर साकारलेले हे दृश्य गीता बाली यांना स्वप्नवत वाटते. गाण्यातील गोड अर्थाने त्या कुतूहलात रमतात, पण कुठल्या तरी नवख्या भीतीने अस्वस्थ होतात. त्या वेळचा त्यांच्या चेहर्यावरील अभिनय प्रत्येक अंतर्यापुट अभिनव होता. गीता बाली यांचा चेहराच बोलका आहे. दर्शविणाऱ्या अभिनयाचे गूढ चेहऱ्यावरूनच वाचता येते. कोजागरी पौर्णिमेच्या चांदण्या रात्री ताजमहालाच्या यमुनेकडील सज्जात प्रेमी युगुलांना या गाण्यातील आश्वासक सुरांनी स्वर्गीय आनंद मिळतो. त्या काळी अनेक प्रेमी या दिवशी या गाण्याचा आनंद त्या ठिकाणी जाऊन घ्यायची. इतके असरदार हे गाणे आहे.

'श्याम ढले खिडकी तले तुम सिटी बजाना छोड दो...' संगीतकार सी. रामचंद्र यांची भगवानदादांच्या नृत्यशैलीसाठीच १९५१ सालच्या 'अलबेला' चित्रपटातील ही सुरावट भगवानदादाच्या 'रंभा-संभा' नृत्य शैलीला फुलवत गेली. त्याच नृत्य प्रसंगात गीता बालीच्या नेत्रातील स्वप्नाळू भाव व आगळ्या शैलीतील नृत्य सादर करणारे मा. भगवान यांचा भोळा पण मिश्कील भाव यांच्या मिश्रणाने हे गीत अजरामर झाले. त्याचप्रमाणे 'अलबेला' चित्रपटातील 'भोली सूरत दिल के खोटे नाम बडे और दर्शन खोटे', 'शोला जो भडके दिल मेरा धडके' या गाण्यांनी इतिहास घडविला. हात लांब करून खांद्याला झटका देऊन कंबर थोडी मागे नेऊन गाण्यातील लचक सादर करणारे मा. भगवान व त्यांच्याच लकबीला शोभेसा अभिनव नृत्य प्रकार सादर करणाऱ्या गीता बाली एक सार्वत्रिक झिंग रसिकांच्या हृदयात निर्माण करायचे. १९९१ साली 'अलबेला' च्या रंगीत पुनरागमनात वरील तीनही गाणी ऐकताना व त्यावरील नृत्ये पाहताना प्रेक्षकांनी सिनेमागृहे डोक्यावर घेतली होती. भगवान दादांची तर ती शैली स्वतःचीच होती; पण खरी कमाल त्यांना साथ देणाऱ्या गीता बालींचीच होती.

चांदणी आयी बनके प्यार, हो साजना, हो साजना लागी मेरे दिलपर कुठार, हो साजना हो साजना. सुरुवातीच्या काळात १९४९ सालच्या 'दुलारी' चित्रपटातील हे शमशाद बेगम यांनी गायलेले गीत गीता बाली व श्यामकुमारवर चित्रित झाले होते. यात मधुबाला व सुरेश ही जोडीही आहे. गीता बाली श्यामकुमारच्या भोवती गिरक्या घेत नाचत हे मधूर गाणे सादर करते आपली त्या काळातील नृत्य प्रतिभा सादर करते. १९३० साली पंजाबमधील सरगोधा (सध्या पाकिस्तान) येथे हरकीर्तन कौर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच अभिनय व नृत्याची आवड. १९४२ साली 'द कॉबलर' या चित्रपटात बालकलाकार म्हणून काम केले. १९४६ साली डान्स कलाकार म्हणून करीअर सुरू केले. 'बदनामी' हा नृत्यांगना म्हणून पहिला चित्रपट. १९४७-४८ साली सुप्रसिद्ध निर्माता निर्देशक केदार शर्मा यांच्या प्रयत्नांमुळे 'सुहागरात' या चित्रपटात नायिका म्हणून प्रथम पदार्पण. भारतभूषण तिचे पहिले तर १९६३ सालच्या 'जबसे तुम्हे देखा है' या अखेरच्या चित्रपटातील प्रदीप कुमार हे अखेरचे नायक ठरले. १९५५ सालच्या 'रंगीन राते' या चित्रपटात शम्मी कपूर व माला सिन्हा ही जोडी होती. यात माला सिन्हा यांच्या भावाची पुरुषी भूमिका गीता बालीने केली आणि ती तिने सर्वोत्कृष्ट अशी रंगविली. तिच्या या पुरुषपात्री अभिनयाची तारीफ केवळ भारतीय फिल्म इंडस्ट्रीतच नव्हे, तर इतरही देशातील फिल्म इंडस्ट्रीत झाली. एवढी ती अभिनय कलेत निपूण होती.

गुरुदत्त हे ग्यान मुखर्जी यांच्याकडून दिग्दर्शनाचे धडे घेऊन आले होते. त्यांनाही अभिनयाचे धडे गीता बालीने दिले व अभिनेता बनविले. विवाह झाल्यावर शम्मी कपूर करीअरबद्दल साशंक होते. गीता बाली यांच्या प्रेरणेने व शिकवणुकीने शम्मी कपूर यांनी अभिनय पद्धत बदलली. स्वतःची नृत्य शैली प्रस्थापित करून 'याहू' ही खिलाडू प्रतिमा साकारली. 'तुमसा नही देखा' व 'दिल देके देखो'पासूनचे शम्मी कपूरचे काळानुरूप बदल गीता बाली यांची देण होती. पुढे १९८६ साली 'एक चादर मैलीसी' या चित्रपटात 'रानो'ची भूमिका हेमा मालिनी यांनी साकारली. गीता बाली फार घाईगडबडीत निघून गेल्या. चित्रपटसृष्दीट महान योगदान देणाऱ्या गीता बाली उण्यापुऱ्या केवळ ३५ वर्षांच्या आयुष्यात चिरस्मरणीय अभिनयाची पाठशाळा तसेच ' आदित्य व कंचन ही अपत्ये मागे ठेवून २१ जानेवारी १९६५ रोजी देवीच्या आजाराचे निमित्त होऊन जग सोडून गेल्या. संपूर्ण चित्रसृष्टी या आघाताने हादरून गेली. 'अपने पे भरोसा है तो एक दाव लगा ले...' म्हणणाऱ्या गीता बाली स्वतःच आपला दाव अधुरा सोडून निघून गेल्या.

**रमेश पोफळी**

# बिगबींच्या चित्रपटांचे रिमेक करून दाक्षिणात्य इंडस्ट्री टिकली



दाक्षिणात्य चित्रपटांना देशभरातून मिळत असलेला प्रतिसाद पाहून सध्या दाक्षिणेतील तामिळ, तेलुगू, मल्याळी यांसारख्या भाषेतील चित्रपटांचे चांगले दिवस सुरू असल्याचं दिसतं. त्यामुळे हल्ली हिंदीतील अनेक चित्रपटांमध्येही दाक्षिणात्य कलाकार झळकताना दिसतात, तर मोठ्या प्रमाणात दाक्षिणात्य चित्रपटांना हिंदी भाषेत डबही केलं जातं. परंतु, सध्या जरी हिंदीतील चित्रपटांना अनेकदा टीकेचा सामना करावा लागत असला आणि हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये तुलना होत तरी एक काळ असाही होता, जेव्हा दाक्षिणात्य चित्रपट चालायचे नाही. तेथील चित्रपटांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत नसे, त्यामुळे अनेकदा तेथील निर्माते मंडळी इतर भाषेत गाजलेल्या चित्रपटांचा रिमेक बनवायचे. बॉलीवूडमधील चित्रपटांची आता जी परिस्थिती आहे तशीच पूर्वी दाक्षिणात्य चित्रपटांचीसुद्धा होती. अशातच प्रसिद्ध चित्रपट निर्माते राम गोपाल वर्मा यांनी सुपस्टार रजनीकांत, चिरंजीवी यांसारखे प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या चित्रपटांचा रिमेक असलेल्या चित्रपटात काम करून प्रसिद्ध झाले असल्याचं म्हटलं आहे.

वर्मा म्हणाले, ७०-८० च्या काळात दक्षिणमधील चारही भाषेतील चित्रपटसृष्टीमध्ये अमिताभ बच्चन यांच्या चित्रपटांचे रिमेक बनवले जायचे. रजनीकांत, चिरंजीवी, नंदमुरी तारका रामा राव यांनी अमिताभ बच्चनच्या अनेक चित्रपटांचे रिमेक बनवले. अमिताभने पाच वर्षांचा मोठा ब्रेक घेतला आणि त्याचवेळी म्युझिक कंपन्या त्यांची गाणी विकण्यासाठी चित्रपट बनवायला लागल्या. तेव्हाच 'मैने प्यार किया' हा चित्रपट आला होता, पण दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीने मात्र अमिताभच्या चित्रपटांचा रिमेक बनवणं काही थांबवलं नाही आणि त्यामुळेच खरंतर हे सगळे प्रसिद्धीझोतात आले. राम गोपाल वर्मा यांनी असंही म्हटलं होतं, पूर्वी अनेक तरुण दिग्दर्शक शहरी भागांमध्ये लहानाचे मोठे झाल्याने विदेशी चित्रपटांना अधिक महत्त्व देत होते. पुढे ते म्हणाले, तुम्ही जर नीट निरीक्षण केलं तर दाक्षिणेतील व्यावसायिक चित्रपटांचे दिग्दर्शक सिनेमावर फार बोलू शकत नाहीत. दरम्यान, राम गोपाल वर्मा यांच्याबद्दल बोलायचं झालं तर राम गोपाल वर्मा हे प्रसिद्ध चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व लेखक आहेत. त्यांनी आजवर अनेक प्रसिद्ध हिंदी चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. हिंदीसह त्यांनी दाक्षिणात्य चित्रपटांचंही दिग्दर्शन केलं आहे. 'सत्या', 'रंगीला', 'कंपनी', सरकार' यांसारख्या अनेक चित्रपटांचं दिग्दर्शन त्यांनी केलं आहे; तर 'सिंडिकेट' हे त्यांच्या आगामी चित्रपटाचं नाव असून जानेवारी २०२५ ला त्यांनी एक्सवर या चित्रपटाची घोषणा केली होती.

# रणबीर धूम ४ मध्ये खलनायक?

धूम चित्रपटाच्या चौथ्या भागाबाबत महत्वाची अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाची रिलीज डेट संबंधित आणि अभिनेता रणबीर कपूर विषयी बातमी समोर आली आहे. २००४ मध्ये प्रदर्शित झालेला अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मुख्य भूमिका असलेला 'धूम' चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला. यानंतर २००६ मध्ये अभिनेता हृतिक रोशन आणि अभिषेक बच्चन ही जोडी 'धूम २' मध्ये पाहायला मिळाली होती. या चित्रपटाच्या तिसऱ्या भागात आमिर खान आणि अभिषेक बच्चन यांनी एकमेकांसोबत स्क्रीन शेअर केली. यानंतर आता धूम ४ ची चर्चा केली जात असून, रणबीर खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असल्याचे बोलले जात आहे.

निर्माता आदित्य चोप्रा लेखक श्रीधर राघवन यांच्यासोबत धूम ४ ची पटकथा अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आहे. रणबीर कपूर या चित्रपटात नकारात्मक भूमिका साकारू शकतो अशा बातम्या समोर येत आहेत. त्या अनुषंगाने धूम ४ ची पटकथा लिहिली जात आहे. तसेच रणबीर कपूरसोबत या चित्रपटात अनेक अभिनेत्रींच्या नावांची देखील चर्चेत केली जात आहे. पिंक व्हिलाच्या मते, रणबीर 'धूम ४' मध्ये खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. धूम ४ चित्रपटाची रचना जागतिक पातळीवरील अ‍ॅक्शन लक्षात घेऊन केली जात आहे. तसेच चित्रपटाची कथा, दृश्य आधीच सेट केलेल्या YRF स्पाय युनिव्हर्सपेक्षा खूपच वेगळी असणार आहेत. वॉर २ च्या रिलीजनंतर धूम ४ च्या प्री-प्रॉडक्शनच्या कामाला सुरूवात केली जाणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आयन मुखर्जी करणार आहेत. हा चित्रपट २०२७ मध्ये रिलीज होऊ शकतो असे सांगितले जात आहे.





# रणवीर सिंग 'शक्तीमान'ची निर्मिती करणार?

'शक्तिमान' हा ९० च्या दशकातील सर्वात लोकप्रिय टीव्ही शो होता. 'शक्तिमान'च्या रुपाने भारतीयांना पहिला सुपरहिरो मिळाला. २०२२ मध्ये सोनी पिक्चर्स इंडियाने 'शक्तीमान' या चित्रपटाची घोषणा केली. तेव्हापासूनच या चित्रपटात अभिनेता रणवीर सिंग शक्तीमानची भूमिका साकारणार असल्याची चर्चा होती. यातच त्यानं अलिकडेच या शोचे हक्क विकत घेतल्याचं बोललं जात होतं. मात्र, आता रणवीर सिंग या प्रकल्पाशी संबंधित नसल्याचे स्पष्ट झालं आहे. रणवीरच्या टीमने अलीकडेच एक निवेदन जारी करत याबद्दल माहिती दिली आहे. रणवीर सिंगने 'शक्तिमान' प्रकल्पाच्या निर्मितीचे कोणतेही अधिकार मिळवलेले नाहीत. या वृत्तांमध्ये कोणतेही तथ्य नाही, असं त्यांनी सांगितले. सध्या रणवीर आदित्य धरच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त असून त्याचा बहुचर्चित 'डॉन ३' अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, 'शक्तीमान' चित्रपटावरून गेल्या एक वर्षापासून वाद सुरू आहे. मुकेश खन्ना यांनी एका पॉडकास्टमध्ये खुलासा केला होता की रणवीरला शक्तीमान व्हायचं आहे. रणवीर सिंगने त्यांची भेट घेतली होती आणि शक्तिमानची भूमिका मिळवण्यासाठी तीन ते चार तास त्यांना मनवण्याचा प्रयत्न केला होता. पण, मुकेश खन्ना यांनी स्पष्टपणे नकार दिला होता. मुकेश खन्ना म्हणाले होते, माझ्या मते रणवीर शक्तिमानच्या भूमिकेसाठी योग्य नाही. शक्तिमान मालिकेत 'तमराज किलविश'ची भूमिका सुरेंद्र पाल यांनी साकारली होती. 'शक्तिमान' हा चित्रपट जवळपास २०० ते ३०० कोटी रुपयांच्या मोठ्या बजेटमध्ये तयार केला जाणार असल्याचे सांगण्यात आले होते. चित्रपटाच्या घोषणेनंतर प्रेक्षकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सुरुवातीला 'गली बॉय' फेम सिद्धांत चतुर्वेदीचे नाव शक्तीमानच्या मुख्य भूमिकेसाठी पुढे आले होते. त्यानंतर रणवीर सिंगचं नाव चर्चेत आलं. कोणताही अधिकृत अपडेट नसल्यामुळे चित्रपटाच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक म्हणजे आमिर खान. लवकरच आमिर 'खान सितारे जमीन पर' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटानंतर अभिनेता जवळपास तीन वर्षानंतर प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. याचदरम्यान एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. हिंदी चित्रपटानंतर बॉलिवूडच्या

# आमिर दिसणार साउथ सिनेमात

मिस्टर परफेक्शनिस्टने साउथ इंडस्ट्रीकडे आपला मोर्चा वळवला आहे. 'सितारे जमीन पर'नंतर, आमिर खान आणि दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांची जोडी 'दादासाहेब फाळके' यांच्या जीवनावर आधारित बायोपिकसाठी एकत्र येणार आहे. दादासाहेब फाळके यांना भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक मानले जाते. हा चित्रपट भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर आधारित असून, फाळके यांच्या संघर्षमय प्रवासाचे चित्रण या चित्रपटात दिसेल. त्यानंतर आमिर खान प्रसिद्ध साउथ दिग्दर्शक लोकेश कनागराज यांच्या आगामी प्रोजेक्टमध्ये झळकणार असल्याचं म्हटलं जात आहे. आमिरचा हा चित्रपट एका सुपरहिरोवर आधारित असेल. या प्रोजेक्टमध्ये आमिर खान पहिल्यांदाच त्यांच्यासोबत काम करणार आहे. आमिर खानने या नवीन प्रोजेक्टला होकार दर्शवला आहे. लोकेश कनागराजसोबतचा हा त्याचा पहिला चित्रपट असेल ज्याचे शूटिंग पुढील वर्षी २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचं नाव अद्याप गुलदस्त्यात आहे.

